# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**2 JULY, 2018**

[Time : 14-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(40 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(४० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना** : गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती (डबल लाइन स्पेसिंग) अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

गावे आणि शहरे यांच्यामधील राहत्या घरांच्या तीव्र टंचाईमुळे दाट वस्त्यांची वाढ होत आहे. लोकसंख्येची भरमसाठ वाढ आणि ग्रामीण भागातील गरीब लोक खेड्यांतून शहराकडे मोठ्या प्रमाणावर धाव घेत असल्यामुळे ही समस्या आणखी बिकट होत आहे. शहरांमधील भरमसाठ भाडी देणे शक्य नसल्यामुळे हे लोक जागा मिळेल तिथे झोपड्या बांधून राहतात. मोकळी जागा बळकावतात. एरवी मानवी वस्तीसाठी अयोग्य जागांमध्ये हे लोक अनधिकृत झोपड्या उभारतात. जागा मिळेल तिथे झोपडी उभारली जाते. सांडपाणी व्यवस्थेकडे लक्ष दिले जात नाही. शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा तिथे नसतो, एवढेच नव्हे तर जीवनावश्यक किमान सुखसोईचाही अभाव असतो. मिळेल त्या तकलादू सामग्रीने उभारलेल्या या झोपड्या तेथील बकालपणात अधिकच भर टाकतात. सामाजिक नीतीमूल्ये आणि सुरक्षितता त्यामुळे धोक्यात येते. अनेक गंभीर सामाजिक प्रश्न डोके वर काढतात. तेथील लोकाचे कौटुंबिक जीवन तर विस्कळीत होतेच पण शेजाऱ्या-पाजाऱ्यांमध्ये भांडणे होतात, व लहान मुलांच्या संगोपना दुर्लक्ष होते. गुन्हेगारी, गुंडागिरी यांसारख्या सामाजिक समस्यांना देखील या वस्त्यांमध्ये खतपाणी मिळते. युवाशक्ती वाममार्गाला लागते, विघातक कृत्यांमध्ये गर्क होते, कष्ट न करण्याकडे त्यांचा ओढा वाढतो. ती आळशी होते आणि त्यातूनच वैफल्याचा उद्रेक होऊन सामाजिक अस्वस्थता वाढते.

---